


गायनाचार्य पं. नारायणराव व्यास अमृत महोत्सव स्मरणिका

और नही कछु काम के । मैं भरोसे अपने राम के ॥
जो चाहे सो पदारथ । अंत देत सुख धाम के ॥

स्वररचनाकार— पं. विष्णुदिगंबर



दरबारी रागातील वरील गुरुमाउलीची रचना पं. व्यासानी अनेकवार गायिली असेल. नारायणरावांची मनोकामना नुकतीच संगीत नाटक अकादमीच्या सन्मानाने फलद्रूप जाहली. राष्ट्रपती माननीय जत्तीमहाशयांसमोर पद्मश्री पु. ल. देशपांडे पण दिसतात.

॥ ॐ नादब्रह्मणे नमः ॥

यस्य सर्वे समारम्भाः संगीतोद्धारहेतवे ।
तस्मै दिगंबरांशाय विष्णवे गुरवे नमः ॥ १ ॥



'गुरूणां गुरुः' गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर

गायनाचार्य पं. नारायणराव व्यास चिरायु होवोत

दादर–मुंबई
१२ जून १९७७

—अमृत महोत्सव सत्कार समिती

सत्कार समिति

अध्यक्ष : डॉ. वसंतराव राजोपाध्ये

उपाध्यक्ष : श्री. वसंतराव कुळकर्णी

कोषसचिवः श्री. विद्याधर व्यास

सहसचिव : श्री. शंकर अभ्यंकर

: श्री. भालचंद्र देशमुख

सदस्य

सौ. विमल कुळकर्णी

श्री. चंद्रकांत आपटे

श्री' यशवंत जोशी

श्री. शरद साठे

श्री. प्रसाद सावकार

श्री. सुरिंदर सिंग

श्री. बलवंत जोशी

श्री. दत्तोबा ऐतवडेकर


डॉ. अविनाश गोडबोले

श्री. पु. ह. पालकर

श्री. विनायक फाटक

श्री. रामकृष्ण बाक्रे

श्री. गो. शं. हुजूरबाजार



गायनाचार्य **पंडित नारायणराव व्यास**

अमृत महोत्सव सत्कार समिती

व्यास भुवन, १४८ हिंदू कॉलनी, दादर, मुंबई ४०० ०१४ दूरध्वनी ४४८९५१

हा ही एक छोटा ख्यालच !

काही व्यक्तींच्या जीवनांतील पन्नाशी, एकसष्ठी हे समारंभ समाजा-सही आनंदोल्लासी ठरतात. याच्या पुढील टप्पा म्हणजे अमृत महोत्सव. गुरुचरण विलीन गायनाचार्य पं. नारायणराव व्यास यांनी रामनवमी-पूर्वी पांच दिवस आधी वयाची पाऊणशें वर्षें पुरी केली. त्यांच्या सतत श्रमाचें व श्रमातून उभारलेल्या श्रींचे कौतुक करावयास कुणीहि एका पायावर तयार होईल. आम्ही त्यापैकीच की, ज्यामध्ये शिष्य आहेत, समव्यवसायी आहेत, रसिकलेखक पण आहेत सदासिद्ध दाद देण्यासाठी. ही स्मरणिका म्हणजे मध्य वा द्रुत एकतालातील ख्यालच. आम्हाला आमच्या उणीवेची जाणीव आहे, कारण, ग्वाल्हेर गायकीचा बडा ख्याल तिलवाड्यातच आम्ही मांडायला हवा होता.–! पण.. ,

गोड मानून घ्यावा ही सविनय विनंती.

—सत्कार समिती

कार्यक्रम

रविवार दि. १२ जून १९७७

पहिली संगीत सभा : सकाळी ९

प्रार्थना :

सौ. विमल देडवते	(गायन)
श्री. चंद्रकांत आपटे	(गायन)
श्री. प्रसाद सावकार	(गायन)
श्री. शरद साठे	(गायन)
श्री. शिवकुमार शर्मा	(संतूर)

दुसरी संगीत सभा : सायं. ५

प्रार्थना :

सौ. रोहिणी चांदेकर	(गायन)
श्री. विद्याधर व्यास	(गायन)
श्री. शंकर अभ्यंकर	(सतार)
श्री. सुरिंदर सिंग श्री. तेजपाल सिंग	(गायन)
श्री. डी. के. दातार	(व्हायोलीन)
पं. नारायणराव व्यास	(गायन)


सत्कार समारंभ

अध्यक्ष : माननीय **श्री. सुशीलकुमार शिंदे**, राज्यमंत्री

प्रमुख अतिथी : माननीय **श्री. वि. स. पागे**, सभापति

प्रमुख वक्ते : **श्री. विद्याधर गोखले**

राजहंस नव्हे ! व्यासच



'नारायणा, तूं नटासारखा दिसलास तरी हरकत नाही, पण अंतरी नाना कळा असणाऱ्याचा वेष रुबाबदारच हवा!' हा गुरुमंत्र पं. विष्णु दिगंबरानीच दिला असावा.

आशीर्वाद

न. र. फाटक

पं. नारायणराव व्यास यांना आज गायनाचार्य म्हणून न ओळखणारा मुंबइ शहराच्या अफाट वस्तीत खरा संगीतप्रेमी नागरिक एकही सापडणे अशक्य असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. पं. विष्णु दिगंबरांच्या सहवासात ज्यानी संगीताचे धडे आलापले, त्यातले पं. नारायणराव हे एक कर्तृत्वशाली शिष्य असून त्यांच्या मुळे पं. विष्णु दिगंबरांच्या लौकिकाला अधिक उजाळा मिळाला, असे निःशंकपणे म्हणता येते. पं. नारायणराव हे पं. पलुस्करांचे शिष्य खरे पण शिष्य स्वतःच्या गुणोत्कर्षाने गुरुच्या कीर्तीत भर टाकील तर त्या शिष्याची योग्यता निराळेच तेजस्वी रूप धारण करते. प्रस्तुत लेखक लाहोरच्या गांधर्व महाविद्यालयात पं. विष्णु दिगंबरांचा अंतेवासी या नात्याने १९०५ मध्ये दाखल झाल्यापासून पुढे त्या विद्यालयाशी अखंड संबंध राहिल्यामुळें त्या महापुरुषाची शिष्यपरंपरा त्याच्या नजरेसमोरून गेलेली आहे. त्यात आपल्या गुणगौरवाने आपल्या देशात उठून दिसणारे जे पं. विष्णु दिगंबरांचे शिष्य आज स्मरणांत उभे राहतात त्यात पं. नारायणरावांचे स्थान निराळ्या उंचीचे आहे हे मुद्दाम सांगायला नको. प्रस्तुत लेखकाने प्रख्यात गायक मरहूम रहिमत खाँ यांच्या गांधर्व महाविद्यालयांत चाललेल्या जलशामध्ये त्या खाँसाहेबांच्या मागे साथीला बसत असता पं. नारायणराव व्यासांना प्रथम पाहिले व त्यांची गायनातील तयारीही अनुभवली. कधी कधी मोठ्या गायकाची साथ म्हणजे काय व कशी साधकरील्या करावी, याबद्दल पं. व्यासांबरोबर त्यांच्या गुरुवर्यांनी चर्चा केल्याचे प्रसंग, पुसट पुसट स्मरणांत आहेत.

पं. विष्णु दिगंबर आपल्या शिष्यांविषयी व्यक्तिशः नावे घेऊन सहसा बोलत नसत, पण एखाद्यावेळी या नियमाचे भान सुटून ज्यांच्या भविष्याबद्दल ते उल्हासानें बोलत त्यांत पं. नारायणरावांचे नाव बिनचूक निघत असे. ती गुरुकृपा पं. नारायणरावांनी भरघोस सफळ करून आपलेही नांव गुरुवर्यांच्या जोडीने भविष्यकाळी सदैव उच्चारले जाईल अशी गायन-विद्येची प्रकांड सेवा बजावली आहे. आज ते शतकाचा तीन चतुर्थांश भाग संपवून पुढील एक चतुर्थांश भागात प्रवेश करीत आहेत. हा काळही विजयशाली होवो. हा प्रस्तुत लेखकाचा ज्येष्ठ गुरुबंधू या नात्याने मनःपूर्वक आशीर्वाद.

पं. नारायणराव व्यास यांचा एक 'बडा ख्याल'

—रामकृष्ण बाक्रे

पहिल्या पंचविशीत विद्यार्जन केलं नाहीस, दुसऱ्या पंचविशीत धन जोडलं नाहीस, तिसऱ्या पंचविशीत पुण्यसंपादन केलं नाहीस, मग आता चौथ्या पंचविशीत तूं करणार तरी काय? खरोखर गायनाचार्य पं. नारायणराव व्यास यांना असा प्रश्न साक्षात् परमेश्वर देखील विचारू शकणार नाही. यापैकी प्रत्येक गोष्ट उत्तर प्रकारे पार पाडून आदर्श गृहस्थ-गवई कसा असावा हे त्यांनी दाखवून दिलंय्. तिथीप्रमाणं दोन महिन्यापूर्वी चैत्र वद्य पंचमीस त्यानी चौथ्या पंचविशीत पदार्पण केलं. आज अमृतमहोत्सवी वर्षपूर्ती निमित्त त्यांचा जाहीर सत्कार होत आहे इतकंच.

चौथी पंचविशी असा शब्द प्रयोग अगदी सहेतुक करावासा वाटतो म्हणूनच केला आहे. पं. नारायणराव शहात्तरीत उतरले असले तरी वार्धक्यानं वाकलेले नाहीत की गात्या गळ्यावरहि त्या वार्धक्याचा फारसा परिणाम झालेला नाही. 'मी तरं सर्वार्थानं तृप्त आहे, एक कल्पवृक्ष मला गवसला आणि त्याच्या छायेत वयाच्या दहाव्या-वर्षापासून मी वाढलो, जी जी इच्छा केली ते ते सारं मला मिळालं' असं ते परवां सहज बोलून गेले.

नारायणरावांना कोणता कल्पवृक्ष गवसला हे सर्वांना ठाऊक आहे. या कल्पवृक्षाची छाया अनेकांना लाभली पण सारेच कांही अखिल भारतीय कीर्तीचे गायक झाले नाहीत. तो मान मिळाला फक्त तिघांना. पं. ओंकारनाथ, पं. विनायकबुवा पटवर्धन आणि पं. नारायणराव व्यास 'मेनी आर कॉल्ड बट फ्यू आर चोझन' म्हणतात ना त्यांतलाच प्रकार. पं. विष्णु दिगंबर यांनी अनेकांना बोलावलं पण कृपा लाभली फक्त थोड्यांना. त्या थोड्यांपैकी एक पं. नारायणराव.

ही चौथी पंचविशी पूर्वायुष्यातील आठवणींच्या चित्रपटात माणसाला नेहमीच गुंतवून ठेवणारी असते. नाना काही याला अपवाद नाहीत. (पं. व्यास यांना सर्वजण नाना म्हणतात) कोल्हापूरचे अंबाबाईचे मंदिर, तिथ परंपरेन चालत आलेला व्यास घराण्याचा पुराणिकाचा पेशा थोडी शेती, एकघर, सगळं कस सुखी जीवन होतं आजोबांच्या कारकिर्दीत पण वडील पुराण सांगू लागले तरी त्यांचं सगळ लक्ष असायचं त्यावेळी गाजणाऱ्या किर्लोस्करी नाट्य-संगीतात! त्यांतच केव्हांतरी दोन-अडीच हजारांचा व्यवहार अंगाशी येताच व्यासांच्या घरात दारिद्र्यानं ठाण मांडलं. आर्थिक धक्क्यानं वडील कोसळलेच. ते वारले तेव्हां बाल नारायण होता अवघा दीड वर्षांचा.

बाल मनाचा खेळ

या बालपणीच्या आठवणी नाना आता रंगात येऊन सांगत असले तरी त्या वयात त्या बेचैन करणाऱ्याच होत्या. कोल्हापुरास त्या काळात दसऱ्याच्या दिवशी अंबाबाई पुढं मोठ्या सुस्वरूप आणि फिरत्या गळ्याच्या बायका उभ्या राहून मैफल नटवीत असत. नाना म्हणाले, 'या गाण्यांना खूप गर्दी व्हायची. मी तर त्यावेळी लवलवत्या गवताच्या पात्यासाला होतो. कुणाच्याहि ढांगेखालून घुसून त्या मफलीत सर्वात पुढं जाऊन बसायचा. रक्तातच वेड होतं गाण्याचं. आपला आवाज मधुर आहे याचीही बालसुलभ मस्ती होती. मिय्याजान, सोपीजान अशी बहुधा त्या गाणारणींची नावं असावीत. आंतून वाटे, यांच्यासारखं मला गायला येईल का? आतां त्या विचारानं हंसू येतं पण त्यावेळी असंहि वाटून गेलं की या दोघींपैकीच कुणीतरी आपली आई असती तर गाणं शिकण्याचा आपला प्रश्न किती चुटकीसरशी सुटला असता.'

या आठवणीवरून नाना पुढं सरकले आणि सांगू लागले, मला त्यावेळचं महाद्वारातील पं. विश्वनाथ जाधव यांचं शारदा संगीत विद्यालय आठवतं. पै. वा. अब्दुल करीम खाँ यांच्या घराण्यातली विद्या तिथं दिली जाई. या विद्यालयात मला घाला म्हणून आमच्या पालन कर्त्या मामांना मी एकदां म्हणालो देखील. तर म्हणाले. गाणंशिकून बिघडशील. पण मी तर उपजतच गाण्यानं बिघडवला गेलो होतो.

जाधवांच्या विद्यालयाखाली रस्त्यावर उभा राहून वरून येणारे सूर झेलीत तासन् तास राहायचा. एकदा तर कोल्हापुरातील कुप्रसिद्ध म्हशींचा तांडा माझ्या अंगाला घसटून गेला नि एका म्हशीनं माझ्या पायावर आपलं एक चतुर्थांश वजन टाकल्यामुळं सबंध पाय रक्तबंबाळ झाला ! लहानपणी एकादं वेड कोणत्या थरापर्यंत गेलेलं असतं त्याचा हा पुरावाच म्हणानात.'

निव्वळ योगायोग

पं. विष्णु दिगंबर यांच्या गांधर्व महाविद्यालयात जायचं कसं जमून आलं असं विचारताच नाना म्हणाले, तेही काही अगदी सहजा सहजी जमलं असं नाही. खूपखूप तळमळलो तेंव्हांच तो योग आला. १९०८ साली पंडितजीनी मुंबईला गांधर्व महाविद्यालयाची शाखा काढली. मिरज, कोल्हापूर इथपर्यंत त्या विद्यालयाची शिस्त, सभ्यता यांची कीर्ती पोचली होतीच. शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्याला नऊ वर्षांचा बाँड लिहून द्यावा लागे. आमच्या कोल्हापुरातून पहिल्यांदा गेले वामनराव पाध्ये. वामनराव लहानपणी भयंकर व्रात्य. त्यांच्या आईनं मुलाला कडक शिस्त लागावी म्हणूनच पाठवलं होतं. त्यांचं ठीक चाललंय् हे कळल्यावर माझ्याहून पाच वर्षांनी मोठे असलेले माझे बंधू शंकरराव गेले. बहुधा दहा साल असावं. पं विष्णु दिगंबरांचं सुस्वर रामायण प्रवचन त्यावेळी कोल्हापुरात झालं होतं. मी तर अक्षरशः भारून गेलो होतो. शंकरला त्यांनी निवडल्यावर तर वेडापिसाच झालो. जेवणखाण, कपडालत्ता हा सर्व खर्च सोसून पंडितजी शिक्षण देत. त्यामुळं एकाच घरातून दोन मुलं ते कशी घेतील असा प्रश्न मला सतावू लागला. मामांच्या परवानगीने मी पं. विश्वनाथ बुवा जाधव यांच्या कडे थोडं थोडं शिकूही लागलो होतो पण मनातली इच्छा मात्र शंकरप्रमाणं आपल्यालाहि चान्स मिळावा अशीच होती. तो योग १९१२ साली आला. पं. विनायकबुवांचे चुलत चुलते हरिभाऊ पटवर्धन कोल्हापुरास असत. त्यांना भेटण्यासाठी पं. विष्णु दिगंबर आले होते. शंकरदादाचे क्षेम विचारण्याचं निमित्त करून मी तिथं गेलो आणि बाजूला बसून राहयलो. माझ्याकडे लक्ष जातांच पंडितजीनी पटवर्धनांना विचारलं.

हा कोण ?

हा शंकर व्यासचा धाकटा भाऊ नारायण. मोठा सुरेल गळा आहे याचा—पटवर्धन.

अरे मग काही म्हणून दाखव की—पंडितजी.

मी मग जाधवांच्याकडे गळ्यावर चढत असलेला भूप ऐकवला. पंडितजींना काय वाटलं कुणास ठाऊक. ते लगेच म्हणाले,

मग इथं राहून काय करतोस ? तूंहि मुंबईला विद्यालयात कां दाखल होत नाहीस ?

मी मनातल्या मनात खूप उंच उडी मारली. जे अशक्य वाटलं ते असं योगायोगानं शक्य झालं. कल्पवृक्षच लाभला मला. त्यावेळी दीडशे तरी विद्यार्थी मुंबईच्या शाळेत असावेत. त्यांचे गट पाडून स्वयंपाक, झाडलोट, बाजारहाट अशी आठ आठ दिवसांची कामे वाटून देत. शिक्षण केवळ गाण्याचंच नसे. वाद्यांचंही असे. तबला, मृदंग, दिलरुबा. अगदी शाळेप्रमाणं तास. शिवाय संस्कारांचं शिक्षण चाले. पवमान, रुद्र वगैरे शिक्षण देण्यासाठी वेगळे गुरुजी येत. व्यवस्थितपणा टापटीप यांचेही संस्कार होत. माझ्याडोक्यावर चांगली वीतभर लांब शेंडी होती. पंडितजींनी ती गेल्यागेल्याच उतरवली. मुख्य म्हणजे प्रवेश दिल्यापासून तीन महिन्याच्या आत स्वरसाथीसाठी पंडितजींनी मला त्यांच्याबरोबर दौऱ्यावर नेलं. कृपापात्र ठरलो त्याची ही पहिली खूण.

फिरते विद्यालय

रामायण प्रवचने आणि जोडूनच थिएटरातील जलसे हे एक मोठं शिक्षणच होतं. मी कितीतरी गोष्टी या दौऱ्यात शिकलो. पक्कं गाणं लोकांपर्यंत पोचविण्याच्या कामी पारंपरिक भजनं छान उपयोगी पडतील हे जाणवलं दौऱ्यातच. लोकव्यवहार कसा असतो; त्यांच्याशी वागावं कसं हे मनानं टिपलं दौऱ्यातच. सर्वांचं गाणं ऐकावं नि त्यातून घेता येईल ते घ्यावं ही उदारता शिकलो याच फिरत्या शाळेत. मला वाटतं १६-१७ साल असेल पंडितजींनी भूगंधर्व रहिमतखा यांचं गाणं ठेवलं होतं. मी आणि व्यंकटेश मोडक हे दोघे गोडं आवाजाचे म्हणून होतो तानपुऱ्यावर. विशेष म्हणजे या बैठकीला लोकमान्य टिळकांना आवर्जून बोलवण्यात आलं होतं नि तेही थोडावेळ देऊन गाणं ऐकून गेले होते. या

गाण्याच्या दुनियेतले दिग्गज ऐकायला मिळाले तेही देश-भरच्या भ्रमंतीतच. बिहारचे ध्रुपदिये पं. रामचतुरमालिक, पं. भास्करबुवा, पं. वझेबुवा, उस्ताद हफीजखाँ सरोदिये आणखी कितीतरी! पण मला आठवण होतेय ती आमच्या पंडितजींच्या दक्षतेची. बरोबर असणारे विद्यार्थी खातात काय, त्यांची आबाळ होत नाहीए ना, याकडं त्यांचं लक्ष असायचं. म्हैसूरला एकदा दीड रुपया शेर दुधाचा भाव कडाडला! त्यावेळचा दीड रुपया! चार आणे शेर दुधाचे दिवस ते! आम्ही दूध खरेदीच केलं नाही. रोज रात्री सर्व विद्यार्थ्यांनी पेलापेला दूध पिऊन झोपायचं असा नियम असे. दूध खरेदीच केलं नाही म्हटल्यावर पंडितजी भडकले! माझ्यावर तर त्यांची विशेष मर्जी असे. मी कधी त्यांच्या हातचा मार खाल्लेला नाही. स्वरसाथ करताना तार षडज् दीड मिनिटपर्यंत लावी तेव्हां त्या प्रदीर्घ दमसासीनेच श्रोते दिपून जात! दुधावरून प्रश्न निघाला तेव्हां पंडितजी म्हणाले, गाणाऱ्यानं खुराक तोडून कसं चालेल? आणि ते तसलं महाग दूधहि म्हैसूरच्या दौऱ्यात आम्ही नेहमीप्रमाणे घेत होतो.

अहमदाबादेतील स्वप्नं

नऊ वर्षांचा बाँड संपवून आणि स्नातक होऊन नाना संगीत प्रचार आणि उपजीविका या दोन्ही गोष्टी अहमदाबादेस आपले बंधू श्री. शंकरराव व्यास यांच्या समवेत साधू लागले तेव्हांच्याही आठवणी आज ते रुचीनं सांगतात. या बंधुद्वयाने गुजरात संगीत विद्यालय स्थापलं होतं. उद्योगपती अंबालाल साराभाई सारख्या प्रतिष्ठित घरातून संगीताच्या शिकवण्या मिळूं लागल्या होत्या. खुद्द गांधीजींनाच पं. विष्णु दिगंबरांचे आकर्षण असल्यानं व्यासबंधूंचा जम गुजरातेत आणि सौराष्ट्रात बसायला वेळ लागला नाही. राजकोट, भावनगर येथल्या गणेशोत्सवात गाण्याची संधी मिळू लागली. मोठमोठ्या उद्योगपतींकडे लग्न कार्य निघाले की गाणे व्हायचे. एकदां तर फारच गंमत झाली. ती सांगतांना नाना म्हणाले.

‘बाप होता तीन गिरण्यांचा मालक. घरात मुलाचे लग्न. बापाला गाणंबजावणं यात मुळीच रस नव्हता. उलट लग्नप्रसंगी गाण्याबिण्याचं काय प्रयोजन असंच त्याचं मत होतं. पण मुलाला नवी फॅशन पसंत होती. गाणं ठेवलंच पाहिजे म्हणून तो म्हणूं लागला. मी त्याच्या वडिलांना म्हणालो, मुलाचा एवढा आग्रह आहे तर आम्ही एक तासभर येऊन जाऊ. आपण आमच्या गाण्यासाठी एक पैशाचीही तोशीस लावून घेऊ नका. विनामूल्य कार्यक्रम देऊ.’

माझ्यासारख्या ऐपतदार माणसाच्या घरी तुम्ही गाणार आणि एक पैसाही न घेता? हा माझा कमीपणा ठरेल. लोक हंसतील मला. एक तासभर गाण्याचे किती पैसे द्यावे लागतील बोला—

फार नाही, फक्त एकशे एक रुपये! मी म्हणालो.

गाणं ठरलं. आम्हाला वेळ आंखून देण्यात आला. साथिदारांनिशी आम्ही हजर. पण नेमकी तीच वेळ त्या श्रीमंतानं बँडवाल्यांनाही दिली होती. प्रांगणांत बँडच्या ताफ्याचा दणदणाट आणि आत आमचं गाणं. एक स्वर कुणाला ऐकूं येईल तर शपथ! मग मी मनाशी विचार केला, हार्मोनियम, तबला आणि तानपुरे हे व्यवस्थित चालू द्यात. आपण फक्त चिजेचं अथवा भजनाचं तोंड दाखवून द्यायचं नि पुढं सगळा ‘मूकाभिनय’च करायचा. हातानी सम दाखवायची. हातानी फिरत दाखवायची पण गायचं म्हणून नाही आणि अशी ती मैफल जमून गेली. कुणाला काही-सुद्धां समजलं नाही!

हा विनोदाचा भाग सोडला तरी नाना अहमदाबादेत निराळीच स्वप्न रंगवीत होते. हे काही खोटं नाही १९२३ ते १९२७ चा हा काल. ध्वनिमुद्रिका ही नवी ‘मास-मीडिया’ गाण्याच्या दुनियेत दाखल झाली होती. आणि खरा प्रचारक प्रत्येक नवं माध्यम आपल्याला यशस्वीपणे कसं हाताळतां येईल हे पहात असतोच. नानांचे विचार त्या दिशेनं चालू झाले होते. अहमदाबादेपेक्षा मुंबई बरी या निष्कर्षावर ते आले ते यामुळं. ती मनोवस्था सांगताना नाना म्हणाले.

‘ध्वनिमुद्रिकांच्या द्वारा बरोबरात अभिजात संगीत गेलं पाहिजे असं मला वाटूं लागलं. त्यासाठी एक युक्ती मनात आली. बडा अथवा छोटा ख्याल ध्वनिमुद्रिकेसाठी घ्या म्हटलं तर कंपनी कांकूं करील हे उघडच होतं. कंपनीला नफ्यासाठी व्यवहार करावा लागणार. त्यांत गैर कांहीच नव्हतं. तेव्हां एका बाजूला सर्वांच्या चटकन् जिभेवर रुळेल असं भजन असावं आणि दुसऱ्या बाजूला ख्यालाचा नमुना असावा असं माझ्या मनानं घेतलं. यामुळं पंडितजींच्यापाशी घेतलेली संगीत प्रचाराची शपथ तर मी पार पाडणार होतोच

पण पर्यायानं स्वतःच नांवही करणार होतो. अहमदाबादेसच एकूण सहा ध्वनिमुद्रिकांचा म्हणजे सहा ख्याल आणि सहा भजनें असा माझा प्लॅन मी डोक्यात योजून ठेवला होता. त्यासाठी जोहराबाई आणि नारायणराव बालगंधर्व यांच्या ध्वनिमुद्रिकांचा मी सूक्ष्म अभ्यासच सुरू केला. याविषयाची पकड मनावर एवढी असे की क्वचित शिकवणीच्या ठिकाणीही शून्यात दृष्टी लावून विचार चालू असे. एकदा तर शिकणाऱ्या मुलीने विचारले देखील.

केम पंडितजी तबियत सारी छे न...?

पण मुंबईकडे डोळे लावून बसलेला मी तिच्या प्रश्नाला काय उत्तर देणार ?

मुंबईतील पहिली मैफल

आणि मग शंकररावांचा—मोठ्या बंधूंचा—सल्ला न मानता मुंबईस आलोच. गणेशोत्सवाचे दिवस होते. पं. विनायकबुवांची दोन गाणी ठरली होती पण प्रकृती ठीक नसल्यानं ते गाऊ शकत नव्हते. त्यांनी आयोजकांना सांगितले, 'माझ्याऐवजी व्यास गातील.'

ठरलेला नि जाहीर झालेला कार्यक्रम बदलायला उत्सवाची मंडळी तशी फारशी खूष नसतात. ही मंडळीही नव्हतीच. विनायकबुवांनी त्यांना सांगितलं, 'नारायणरावांची बैठक फेल गेली तर बिदागीचे पैसे माझ्याकडून वसूल करा.' इतका आत्मविश्वास होता त्यांना माझ्याबद्दल.

त्या विश्वासाला मी पात्र ठरलो आणि मुंबईत जो एकदा दृढ पाऊल रोवून उभा आहे तो आजतागायत. त्यावेळी नुक्तच माझं लग्न झालं होतं. पत्नीला माहेरी ठेवून मी सरदारगृहात एक कॉट भाड्यानं घेऊन राहात असे कारण साळवेकर, सरदारगृहाचे मालक हेच मजकडे शिकत. शिवाय तिथं टेलिफोन होता. चांगला सहा वर्ष सरदारगृहात राह्यलो.

नाना आता ओघात येऊन बोलत होते. त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या मनोव्यापाराची दोन टोके जाणवली. पहिली जाणवली ती त्यांची गणेशभक्ती आणि दुसरी जाणवली ती विज्ञानभक्ती 'गणपती उत्सवाच्या तोंडावर आलो, वडिलांचं नांव गणेश, मुलाचं विद्याधर अशा गणेशभक्तीमुळे मी यशस्वी झालो असं ते म्हणाले.

पण गणेशभक्ती इतकीच ग्रामोफोन, रेडिओ या नव्या शोधावर त्यांची भक्ती होती. २७ सालीच मुंबईच आकाशवाणी केंद्र सुरू झालं. त्या केंद्रावर अनुक्रमानं तिसरा कार्यक्रम झाला तो पं. व्यासांचाच. पहिला झाला बालगंधर्वांचा. दुसरा श्रीमती सुंदराबाईंचा आणि तिसरा व्यासांचाच. ग्रामोफोनची ध्वनिमुद्रिका साडेतीन मिनिटांचा ख्याल बरोबरात नेईल हेहि हेरले नानांनीच. साडेतीन मिनिटात सिद्धांत प्रस्थापित करता येत नसतो असं मध्यंतरी डॉ. वसंतराव देशपांडे म्हणाले होते. नानांना ते अमान्य आहे असं नाही. पण त्याचा ईषद् आविष्कार करता येतो. १९२९ साली 'अडाणा' मधील अपूर्व चपळ फिरतीची पहिली रेकॉर्ड बाहेर पडली आणि नारायणराव व्यासांचं नाव सर्वतीमुखी झालं. हा मान त्यांच्याकडे चालतच आला. एका शिकवणीच्या घरी रूपजी हे त्यावेळचे एच. एम. व्ही.चे अधिकारी योगायोगानं भेटले. नानांनी आपली योजना (एक बाजू भजनास व दुसरी बाजू ख्यालास) सांगून टाकली आणि देण्याघेण्याचे काहीही न ठरविताच ध्वनिमुद्रण झाले. सुमारे १५ वर्षे या रेकॉर्डचं जनमानसावर राज्य होतं."


सर्वाधिक खपाची रेकॉर्ड

'राधे कृष्ण बोल मुखसे' या ध्वनिमुद्रिकेमागील इतिहास जरा वेगळा आहे. एक कोकिळकंठी विख्यात गायिका ही ध्वनिमुद्रिका 'ओडियन' या प्रतिस्पर्धी कंपनीला देणार होत्या. एच. एम. व्ही.शी भांडूनच त्या गेल्या होत्या. त्यांची ध्वनिमुद्रिका बाजारात येण्याआधी आपली याच गाण्याची ध्वनिमुद्रिका निघाली पाहिजे या ईर्ष्येने कंपनीचे म्हणजे एच. एम. व्ही चे लोक नानांकडे हट्ट धरून बसले. नानांनी 'अशी स्पर्धा तुम्हांला बरी वाटली तरी मी त्या थोर गायिकेचे गुण जाणत असल्याने मला प्रशस्त वाटत नाही.' वगैरे सांगून पाहिले पण मंडळी पिच्छा सोडीनात. मग एका अटीवर त्यांनी ध्वनिमुद्रण होऊ दिले. अट होती नानांना स्वतःला ते ध्वनिमुद्रण पसंत पडेपर्यंत कितीहिवेळा करावं लागलं तरी करायचं. या भजनास नारायणरावांनी 'सिहेंद्रमध्यम' या दाक्षिणात्य रागाचा टच देऊन एक वेगळी गोडी आणली आहे. एच. एम. व्ही. ने त्वरा करून 'ओडियन' कंपनीच्या आधीच ते सर्वाधिक ध्वनिमुद्रिका खपाचे 'सुवर्ण पदक' नानांना पुढं दिलं ते उगीच नव्हे !

पण हा 'सिहेंद्रमध्यम' तुम्ही घेतलात कुणाकडून असे विचारता, नाना म्हणाले, "पं. विष्णुदिगंबरांकडे म्हैसूरचे वासुदेवेंद्र नावाचे गायक आले होते त्यांच्याकडून. तोडीतील ऋषभ शुद्ध केला की हा राग होतो. तो दाक्षिणात्य पद्धतीने



सूरसिंगारसंसदेच्या स्वामी हरिदास संमेलनातील कलशाध्यायः सर्वश्री बाबूराव कुमठेकर, पी. मधुकर, शंकर अभ्यंकर, चंद्रकांत आपटे, अनंत जोशी व सारंगीसाथी (१९५६)



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, नवी दिल्ली, प. विष्णु दिगंबर जन्मशताब्दि महोत्सवात पितापुत्र व्यास



गुरुजींचे नांव उज्वल करणारे त्रिमूर्ति गायन पंडितः
नारायणराव व्यास (१९०२)
वामनराव पाध्ये (१८९८)
विनायकराव पटवर्धन (१८९८)

न गाता उत्तर हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन किती रंजक करता येतो याचं पुढं मद्रासला त्यागराजाची कृती गाऊनच मी ३८ साली प्रात्यक्षिक केलं. 'नीदु चरणमुळे' हे ते भजन. या मैफलीला श्री. जयराम अय्यर यांची पत्नी उपस्थित होती. त्याहि एक गायिका. प्रत्येक मैफलीत इंटर्व्हलच्या आधी सर्वांच्या काळजाचा ठाव घेईल असं एखादं भजन मी ठेवीत असे. तिथं हा 'सिहेंद्रमध्यम' एकदा दाक्षिणात्य अंगानं आणि एकदां उत्तर हिंदुस्थानी अंगानं मांडताच सगळ्या सभागृहात 'चुकचुकाटच चुकचुकाट' झाला. दाक्षिणात्य श्रोते गवयाला मनापासून दाद द्यायची झाली की, 'चुकचुक' असं ओरडतात! ही चुक चुक म्हणजे वाहव्वाची किंवा 'ये बात है' बहीणच. सिंधमध्येही मी असाच सिंधकॉफीचा प्रयोग करून मैफिल आपलीशी करून ठेवीत असे. मंचगायकाला ही कसबे अवगत असायलाच हवीत. शुद्ध शब्दोच्चार चमत्कृती, तालाशी लडिवाळ खेळ. कोणता राग किती विसायचा हे सगळं मैफिलीचं तंत्र!'

या मैफिल तंत्रात व्यासांची आणखी एक करामत दाखल करायला हवी. वाद्याची जुगलबंदी नि ध्रुपद वा ख्याल गायकांचीही जुगलबंदी आता सर्वांना ठाऊक आहे. नारायणरावांनी त्यापुढे जाऊन पहिला धाडसी प्रयोग केला तो 'तिगलबंदीचा' सिंध हैद्राबादमध्ये शिकापूर, सक्कर येथे तुळशीदास शेठ त्यांचे जलसे आयोजित करायचा. त्यानंच एकदा सुचवलं की पं. वामनराव पाध्ये, पं. विनायक बुवा व पं. नारायणराव या तिघांनी एकाच वेळी एकच ख्याल कां गाऊ नये? ही कल्पना पहिल्याच खेपेस इतकी यशस्वी झाली की, पुढं पं. वामनराव पाध्ये यांच्या देहांतानंतर विनायकबुवा व नाना यांची देशभर अनेक जागी जुगलबंदीची मैफल होत असे. अशा किमान ५० जुगलबंदी मैफिली आपण गाजवल्या असं ते म्हणाले. एकाच गुरुकडून तालीम झालेली असली म्हणजे अशी जुगलबंदी हमखास यशस्वी होते.

नानांच्या मैफिलीची आणखी काही वैशिष्ट्ये सांगितली पाहिजेत. २९ ऑगस्ट १९३० रोजी कै. आबासाहेब मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्ये लावण्यात आलेल्या जलशाची जाहिरात आजही नानांच्या दप्तरात बघावयास मिळते. १० रुपयापासून ९ आण्यापर्यंत आठ प्रकारचे उतरत्या क्रमाचे तिकिटांचे दर होते. या जलशाचे उत्पन्न त्या काळात सव्वादोन हजार रुपये झाले! (आजच्या हिशोबाने १० हजार रु.) जलशास आलेल्यास एक छापील पुस्तिका देण्यात येई. त्यात क्रमशः कोणते राग व त्या रागातील कोणती बंदीश गायिली जाणार आहे तिची संहिता, तिचे टेक्स्ट दिलेले असे. मध्यंतरात मास्टर नवरंग, श्री. प्रल्हादपंत गानू यांचा जलतरंग आणि दिलरुबा असे. गायल्याजाणाऱ्या चिजेची संहिता देण्याची ही पद्धत पुढे कां आणि कशी बंद झाली हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल.

नारायणरावांनी देशभर अनेक संगीत परिषदा गाजवल्या आणि अखंड भारत होता तोपर्यंत सिंधचा दौरा कधीही चुकवला नाही. याबाबतीत एक ऐतिहासिक घटना मुद्दाम नमूद करून ठेवली पाहिजे. १५ ऑगस्ट १९४७ च्या आधीच्या आठवड्यात नाना आणि पं. डी. व्ही. पलुस्कर शिकारपूर, सक्कर, हैद्राबाद (सिंध) या दौऱ्यावर होते. आणि दैवाची खैर ही की, मीटरगेज गाडीने त्यांच्या स्वाऱ्या अहमदाबादकडे येत असता 'मारवाड' स्टेशनवर गाडी आली आणि पाकिस्तानात कत्तली सुरू झाल्या!

१९२२ साली त्यांनी पं. विष्णु दिगंबरांशी केलेला करार संपला तरी त्या कल्पवृक्षाची छाया त्यांनी मानसिकदृष्ट्या आजमितीपर्यंतही सोडलेली नाही. आपणास लाभलेले सगळे वैभव त्यांच्या कृपेमुळे आहे असेच ते मानतात. त्या छायेत जे जे वांछिले ते ते मिळतच गेले. हिंदुकॉलनीतील निवासस्थानाचा प्लॉट पाचहजारात ९९ वर्षांच्या लीजवर मिळाला नि आज ज्यांची किंमत सहज कांही लाखात होईल अशी इमारत त्यानी फक्त २९ हजारात बांधली! दादरस्टेशन समोरील बिस्मिल्ला बिल्डिंगमधील 'व्यास विद्यालयाची' जागा मिळवतांना थोडा विनोद झालाच. बिस्मील्लाला वाटलं वाटलं यांना गाण्याबजावण्यासाठी जागा पाहिजे त्या अर्थी ही कोठीवर नाचगाणं करणारी मंडळी! तो म्हणालाहि, 'नाचगाने के लिए कमरा चाहिए तो कामाठीपुरामे जाइए!' पण पुढं त्याचं शंका निरसन झालं. या विद्यालयानं गेल्या चाळीस वर्षात विद्यादानाचं पुण्य नानांच्या खाती टाकलं आहे. या विद्यालयामुळंच पं. नारायणराव इंदोरकर आणि श्री. दत्तोपंत ऐतवडेकर यांच्यासारखी श्रेष्ठ कसबाची तबलावादक मंडळी मुंबईस नाना आणू शकले व त्यांना स्थिरपद करू शकले.

'ख्याल' म्हणजे चिंतन असेल तर ७५ वर्षे पूर्ण केलेल्या नानांचे जीवनाकडे मागे वळून बघतांना झालेलं हे चिंतन म्हणजेही एक बडा ख्यालच नव्हे काय?

★

'जीवेत शरदः शतम्'

—पं शंकराव बोडस

ह्या वर्षी (१९७७) श्रीमान नारायणराव व्यास यांनी आपल्या वयाची ७५ वर्षे केली आहेत, सबब त्यांचे शिष्य चहाते, हितचिंतक, रविवार दि. १२ जून १९७७ रोजी मुंबईस त्यांचा ' अमृत–महोत्सव ' साजरा करीत आहेत हे समजल्यावर अत्यानंद झाला. त्यानिमित्त एक स्मरणिका निघणार आहे; त्या निमित्त माझ्या काही आठवणी देऊन, त्यांचे संबंधी माझा मित्रभाव प्रकट करण्याचा विचार ह्या छोट्या लेखात करणार आहे.

मी माझ्या लहान बंधू–श्री. लक्ष्मणराव बोडस-सह १९१८ चे जुलईत मुंबईस गांधर्व महाविद्यालयात दाखल झालो. त्यावेळी विद्यालय सँढर्स्ट रोडवर होते. मला स्मरते की, माझे आधी एक महिना डॉ. बी. आर. देवधर विद्यालयांत प्रविष्ठ झाले. त्यावेळी कोल्हापूर, मिरज सांगली ह्या पंचक्रोशीतील बरेच विद्यार्थी विद्यालयाचे वसतीगृहात होते. माझ्या आठवणी प्रमाणे कोल्हापूरची संख्या जास्त होती जसे :–श्रीकृष्णजी हिर्लेकर, (बावडा संस्थानचे) त्यावेळी बावडा, कापशी इत्यादी जाहागीरदारी कोल्हापूर संस्थानात मोडत होत्या. तसेच कोल्हापूरचे श्री. नारायण खांडेकर, वि. अ. कशाळकर, व्यास बंधू–शंकरराव व नारायणराव, वामनराव पाध्ये, वामनराव ठकार, शंकरराव गद्रे, दीक्षित, कापशीकर, कोडलकर, वामनराव सडोलीकर इत्यादी. मिरजेहून आलेले श्रीमान केशवराव दातार, नारायणराव खरे, शंकरराव पाटक, बाळकृष्ण र. देवधर, विनायकराव पटवर्धन, रघुनाथराव पटवर्धन, सदाशिव आपटे, दत्तोपंत काळे व त्यांचे बंधू व सांगलीहून बोडस बंधू–शंकर व लक्ष्मण–शंकरराव आठवले, वामनराव फडके व माणगांवकर बंधू–वामन व दत्तू–असे–सहा जग. श्री. देवधर आणि माझे हायस्कूलपर्यंतचे शिक्षण, विद्यालयांत असताना आंग्रे-वाडीतील आर्यन एज्युकेशन सोसायटीत झाले. पुढे विद्यालय सोडल्यावर देवधर बी. ए. झाले व मी विद्यालयात राहून नाशकास इंटर पर्यंत शिकलो.

१९१८ ते २२ पर्यंत महाराज (गुरुवर्य विष्णु दिगंबरजी) अडव्हान्स विद्यार्थ्यांना नियमित सकाळ–संध्याकाळ व रात्री गायनाचे शिक्षण गुरु शिष्य परंपरे प्रमाणे देत असत.

त्यावेळी विद्यार्थीवर्गात ज्युनीअर व सीनीयर असे विभाग असत. आमच्या सारख्या ज्युनीयर विद्यार्थ्यांना त्यांचे गायकीचे शिक्षण खोलीबाहेर राहून ऐकण्याचा योग मिळत असे. हलका, गोड आणि चपळ आवाजाचे स्व. व्यंकटेश मोडक व श्री. नारायणराव असे. दोघे जणच त्यावेळी होते. त्या दोघामध्ये एक प्रकारची सात्विक चुरस असे. त्या दोघांच्या, सरळ, अलंकारिक व फिरकीच्या ताना ऐकून आम्हाला एक प्रकारचा हेवा वाटे, व आमच्या गळ्यातून ह्या द्रुत गतीच्या ताना निघतील कीं नाही अशी शंका वाटे. महाराजांचे दौऱ्या वरच्या जलश्यात त्या दोघांचा जुगलबंदीचा कार्यक्रम अप्रतिम व लोकप्रिय होत असे. पुढे १९२३–२४ चे सुमारास व्यास बंधू विद्यालय सोडून अहमदाबादेस स्थाईक झाले. अहमदाबाद शहर तसे व्यापारी, पैशाचा जमही चांगला बसला होता, परंतु कलेच्या विकासाचे दृष्टीने ते शहर मुंबईपेक्षा कोतेच होते. तेंव्हा जेष्ठ बंधूच्या सल्ल्याची किंवा रागाची पर्वा न करता नारायणराव १९२७–२८ चे सुमारास परत मुंबईस येऊन, सरदार गृहात राहू लागले व येथे मनासारखे फील्ड मिळाल्याने, त्यांचे मन मुंबईत रमले.

भाग्योदय

मुंबईमध्ये एच. एम. व्ही कंपनीने ह्या गोड गळ्याचे गवयास गाठले, व त्यांच्या दहा बारा रेकॉर्डस (शास्त्रीय संगीत, भजने ठुमरी इत्यादि प्रकारच्या) तयार होऊन जेंव्हा त्यांचा खप होऊ लागला, तेंव्हा पं. नारायणरावांचे नांव घराघरातून सर्वतो मुखी झाले. त्यांच्या गायनाचा

सुगंध उत्तर हिन्दुस्थानात दरवळूं लागला. त्यांचे दौरे नंतर कानपूर, अलाहाबाद, लखनऊ, बदायूं, इटावा, अलीगढ, फरुकाबाद, बनारस, सीतापूर, बलरामपूर, बरेली इत्यादी उत्तर प्रदेशात व तसेच पंजाब, राजस्थान, बिहार बंगालमध्ये होऊ लागले. एकवेळ अशी होती की, उत्तर भारतातील एकही संगीत परिषद श्री. नारायणरावांचे उपस्थितीशिवाय होत नसे.

कानपूर संगीत समाजाने १९३१ पासून जवळ जवळ वीस संगीत परिषदांचे आयोजन केले. एखादी सोडून नारायणराव सर्वामध्ये हजर होते. त्यांचे गायना-शिवाय परिषद यशस्वी होत नसे, व 'राधे कृष्ण बोल मुखसे' हे भजन ऐकल्याशिवाय श्रोते बैठक किंवा खुर्च्या सोडत नसत. नारायणराव हे परिषदेचा हुकमी एक्का होते.


कानपूरास त्यांच्या दोन बैठकी अविस्मरणीय अशा झाल्या. पहिली स्व. लाला कैलाशपत सिंघानिया यांचे अभि-नन्दनप्रीत्यर्थ, व दुसरी १९६३ मध्ये विवेकानन्द जन्म शताब्दीचे वेळी. कानपूर 'मर्चंट चेंबरने' लाला कैलाशपतजी, चेंबरचे अध्यक्षपदावर निवडून आल्याकारणाने, त्यांचा भव्य सार्वजनिक सत्कार केला. त्यावेळी श्री. नारा-यणरावांना बोलावण्याचे काम मजकडे होते. अधिकतर श्रोते होते शास्त्रीय संगीत न समजणारे व्यापारी. नारायणराव मोठे धूर्त. त्यांनी श्रोतृसमाजावर नजर फेकली व ती मैफिल एक चतुर्थांश ख्याल गायकी व बाकीचा पाऊण हिस्सा, 'श्याम सुन्दर मदन मोहन' 'कहाँके पथिक कहाँ' 'राधे कृष्ण बोल, 'टुमक चलत रामचंद्र' इत्यादी भजनांनी जिंकली. श्रोत्यांची नाडी ओळखणारे गायक फारच कमी असतात. नारायणराव त्या बाबतीत अगदी तरबेज. सांगी-तिक विद्वज्जनामध्ये ते ख्याल, टप्पा व ठुमरीने बैठक रंगवि-तील तर संमिश्र समाजांत ते आपल्या चौमुखी संगीत कलेने श्रोत्याना झुलत ठेवतील. नारायणरावांसारखा लयकारी व तालात पक्का असणारा गायक दुर्मिळ.

कानपूरच्या रामकृष्ण मिशनने स्वामी विवेकानंद जन्म शताब्दि साजरी केली. त्यावेळी एक दिवसाचे संगीत सम्मेलन साजरे झाले. इतर कलाकारांत नारायणराव ही निमंत्रित होते. पाच हजारांचा श्रोतृ समूह, सर्वात शेवटी ठेवलेले नारायणरावांचे गायन ऐकण्यास आतुर होता. त्या भव्य समाजास काबूत ठेवून, शेवटचे भजनाने मठाचे स्वामी सुद्धा मंत्रमुग्ध होऊन गहिंवरले.

स्वभाव विशेष

नारायणरावांचे राहणे फार टापटिपेचे. ते व्यवहारी असल्याने, मुंबईत तीनमजली घर बांधणारे तेच मला वाटते प्रथम गायक असावेत. स्वच्छ राहणी, प्रौढात, बरोबरीचे मित्रांत व लहान मुलांत सुद्धा रमून जाणारा स्वभाव. प्रत्ये-कात तसे बुईक पॉईंटस् असतातच जसे आत्म प्रौढी व तेच तेच बोलण्याचा नाद. फार खर्चिक नाहीत पण उधळे ही नाहीत असा समतोल राखणारा गायक फार क्वचित सापडतो. त्यांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई फार धार्मिक व मुलगा श्री. विद्याधर उर्फ अतुल याने एम. ए पर्यंतचे शिक्षणा-बरोबर गायनात संगीत प्रवीण ही उपाधी हासील केली आहे हे सर्वांना माहीत आहेच. सूनबाई सौ. विनीता व दोघां नातवात सध्या नारायणराव रमून आहेत.

माँ सरस्वतीचे - चरणी शेवटी हीच विनंती आहे की "जीवेत शरदः शतम्" ही उक्ती पं. नारायणरावांचे बाबतीत सार्थ ठरो.



ग्वाल्हेर घराण्याचे उपासक पं. नारायणराव व्यास

—विनायक म. फाटक

ग्वाल्हेर घराण्याचे एक प्रथितयश गायक म्हणून पं. नारायणराव व्यास यांची संगीतप्रेमींना चांगली ओळख आहे. विशेषतः गेल्या पिढीतल्या लोकांनी त्यांच्या कित्येक मैफिली अनुभवल्या असतील. त्यांच्या रागदारी संगीताच्या रेकॉर्डस् खूप ऐकल्या असतील. गेली ५० वर्षे संगीत क्षेत्रात सातत्याने वावरणारे जे काही थोडे कलाकार आहेत, त्यामध्ये पं. नारायणराव व्यास यांचा नंबर खूप वरचा लागेल.

पं. व्यासांचा जन्म कोल्हापूर येथे १९०२ साली झाला. लहानपणी आईवडीलांचे छत्र नाहीसे झाल्यावर मामानी त्यांचा सांभाळ केला. शाळेत शिकत असतानाच संगीताची त्याना आवड निर्माण झाली. त्यातच ११ व्या वर्षी पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांची गाठ पडली आणि यानंतर त्यांनी संगीत क्षेत्रात प्रवेश करण्याचे ठरविले. विष्णुबुवांच्या गांधर्व महाविद्यालयात त्यांचे शिक्षण सुरू झाले. ग्वाल्हेर गायकीचे धडे घेत असताना त्यांना निरनिराळी वाद्ये वाजविण्याचे सुद्धा शिक्षण मिळाले. विष्णुबुवांकडे प्रत्यक्ष शिक्षण त्यानी ३/४ वर्षे घेतले. परंतु पुढे विष्णुबुवांचे बरोबर त्यांनी उत्तर भारतात खूप प्रवास केला, त्यावेळच्या गवयांची गाणी ऐकली. ही सर्व अनुभवाची शिदोरी पाठीशी घेऊन उत्तम संगीत–शिक्षक होण्याचे ध्येय ठरवून त्यांनी संगीताचा व्यवसाय पत्करला. तो काळ डोळ्यासमोर आणला तर त्यावेळी शास्त्रीय/रागदारी संगीताचा प्रचार आजच्या एवढा झाला नव्हता. आजच्या एवढी रेडिओ, टी. व्ही. सारखी साधने उपलब्ध नव्हती. या पार्श्वभूमीवर संगीतक्षेत्र हे कार्यक्षेत्र निवडण्याचा पं. नारायणरावांचा निर्णय उल्लेखनीय म्हणावा लागेल.

सुरुवातीस काही काळ ते अहमदाबाद येथे राहिले. त्यानंतर मुंबईला आले. आणि येथेच व्यवसायाच्या दृष्टीने स्थायिक झाले. प्रथम जरी संगीत शिकवण्या कराव्या लागल्या तरी हळूहळू ठिकठिकाणी गायनाचे कार्यक्रम मिळू लागले. त्यांच्या सुरेल, गोड आणि लवचिक आवाजानी श्रोत्यांवर चांगलीच छाप पाडली.

यानंतरच्या काळात त्यांच्या रागदारी, सुगम संगीताच्या अनेक ध्वनिमुद्रिका बाजारात आल्या. आणि त्या विलक्षण लोकप्रिय झाल्या. २/३ मिनिटांचे अवधीत एखाद्या रागाची तोंडओळख या ध्वनिमुद्रिकांनी करून दिली. शास्त्रीय संगीत प्रचारकार्यात या ध्वनिमुद्रिका त्याकाळच्या मानाने आदर्श म्हणता येतील. विशेषतः दुर्गा, मालकंस, बहार, अडाणा या रागांतील त्यांच्या ध्वनिमुद्रिका उल्लेखनीय आहेत. ध्वनिमुद्रणाचे सुधारित तंत्र यावेळेस वापरले गेले.

ध्वनिमुद्रिकांद्वारा रागदारी, सुगम संगीताचा चांगला प्रचार झाला. आणि पं. नारायणरावांचा आवाज घरोघरी ओळखीचा झाला. यामुळे त्यांच्या जीवनात एक क्रांती घडून आली अगणित मैफिलींची आमंत्रणे यामुळेच त्याना मिळाली. त्यानिमित्ताने त्यांनी भारतभर दौरे केले. त्यानी पट्टीचे गायक म्हणून प्रसिद्धी मिळविली. संगीत क्षेत्रातील त्यांच्या यशस्वितेची ही थोडक्यात कहाणी म्हणता येईल.

पं. नारायणराव ग्वाल्हेर घराण्याची ख्याल गायकी गातात. मध्यलयीत ख्यालगायनाला सुरुवात करून बोल-आलाप, बोलताना व ताना यातून ते रागाचा विस्तार करतात. मुळात आवाज पातळ, लवचिक असल्याने सुराला भिडून लयीच्या अंगाने ख्यालाची बढत केली जाते. स्वच्छपणे अस्ताई ·अंतरा गाणे हे त्यांचे एक वैशिष्ट्य. तानक्रियेमध्ये सुगमसंगीताला जवळ असलेल्या फिरकीच्या ताना जास्त आढळतात. गंधर्वगायकीचा पं. नारायणरावांचेवर हा असर झाला असण्याची शक्यता आहे. जुने जाणते सांगतात की पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचा आवाज खूप मोठा, ढाल्दार असा होता. याउलट पं. नारायणरावांचा आवाज पातळ लवचिक आणि तुलनेत बारीक म्हणता येईल. ही गोष्ट ध्यानी घेऊन स्वतःच्या आवाजाला जे शोभून दिसेल असे चपखल गाणे बनविण्याचा आणि गुरुजीनी दाखविलेल्या सांगीतिक चौकटीतून काहीतरी वेगळे उठून दिसेल अशा प्रकारचा हा प्रयत्न खचितच लक्षणीय आहे. यामुळे त्यांचे

ख्यालगायन जितके सहज तितकेच रसिकांस समजायला सोपे झाले आहे.

“पं. नारायणरावांचे हरिदासी गाणे आहे” अशी त्यांचेवर फार पूर्वी टीका झाली होती. ही टीका करणाऱ्यांनी पं. नारायणरावांचे गाण्यातील सुबोधता–सहजता लक्षात घेतली नसावी. या गुणामुळेच ते इतके रसिकांजवळ पोहोचू शकले. “श्रोत्याना काय आवडेल, काय रुचेल ही गोष्ट त्यांनी नेहेमी विचारात घेतली.” असे तत्त्व त्यांनी दूरचित्र-वाणीवरील मुलाखतीत व्यक्त केले आहे. यातून लोकाभि·मुखता दिसून येते. शास्त्रीय, रागदारी संगीत प्रचाराचे दृष्टीने याला महत्त्व द्यायला हवे.

शास्त्रीय संगीतात ख्याल गायकीखेरीज ग्वाल्हेर परंपरेतील तराणा, टप्पा हे प्रकारसुद्धा पं. नारायणराव गातात. सुगम संगीतातील ठुमरी, भजन, होरी हे प्रकारसुद्धा ते ढंगदार शैलीत मांडतात. किंबहुना शास्त्रीय गायनानंतर भजन, ठुमरी हे प्रकार पं. नारायणरावांच्या बैठकीचे अविभाज्य अंग म्हणावे लागतील. ‘ठुमकी चलत रामचंद्र,’ ‘राधेकृष्ण बोल मुखसें’ ही त्यांची गाजलेली भजने आहेत.


गायनाच्या बैठकीचा हा साचा लक्षात घेतला तर असे दिसते की श्रोत्यांवर कुठल्याही प्रकारचे दडपण न आणता, श्रोत्याना जे रुचेल, स्वतःच्या आवाजाला जे शोभेल अशा पद्धतीचे गाणे पं. नारायणरावानी बनविले आहे. आपल्या सांगीतिक जीवनात श्रोत्यांशी सदैव जवळीक साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. हेच त्यांच्या यशाचे मर्म आहे.

इतक्या सुरेल आणि गोड आवाजाची देणगी असताना, इतके चांगले व्यक्तिमत्त्व लाभले असताना पं. नारायणराव गायकनट का झाले नाहीत असा स्वाभाविक प्रश्न मनात येण्याची शक्यता आहे. या प्रश्नाला पं. नारायणरावांचे उत्तर असे आहे की, एका मैफलीत बालगंधर्वांनी नारायणरावांची मुक्तकंठाने स्तुती केली होती. आणि त्याचवेळेस नाट्यसृष्टीत न शिरण्याचा त्याना सल्ला दिला होता. याची कारणमीमांसा माहित नाही. पण काय सांगावे, गायकनट होण्याचा त्यांनी निर्णय घेतला असता तर नाट्यसृष्टीमध्ये ‘दुसरे नारायणराव’ दिमाखाने वावरले असते.

गेली ५० वर्षे संगीताचा प्रचार करण्याचे कार्य म्हणजे पं. विष्णु दिगंबर पलुस्कर या आपल्या गुरुंचा संपन्न वारसा पं. नारायणरावांनी खंबीरपणे जोपासला आहे. अर्थातच या कार्याची दिशा व स्फूर्ती त्यांनी आपल्या गुरुकडून घेतली. पं. विष्णुबुवांसारखे गुरु लाभल्याबद्दल पं. नारायणराव स्वतःला भाग्यशाली मानतात आणि आपल्या यशाचे श्रेय गुरुकृपेला देतात गुरुबद्दलची निष्ठा व संगीत कलेबद्दलची निस्पृहता खूप बोलकी आहे.

आजमितीस पं. नारायणरावानी ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये संगीत नाटक आकादमीचे त्याना ॲवॉर्ड मिळाले आहे. उत्तरोत्तर त्यांना असेच सन्मान मिळोत आणि असे सन्मान घेण्यासाठी त्याना दीर्घ आयुरारोग्य मिळो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करु या !


— जीवेत शरदः शतम् —





'शंकरदादासारखा मी सुद्धा गवैय्याची बैठक मारणारच'
—नारायण गणेश व्यास, वय १० वर्षे

साठीशान्तीतील समाधानी नारायणराव





नारायणरावांची पंचविशी म्हणजेच ग्रामोफोन कंपनीच्या व्यासपर्वाचा प्रथमाध्याय.



दुसऱ्या महायुद्धाच्या धुमश्चक्रीतदेखील पं. व्यास
यांचे दौरे, जलसे आणि मैफिली घोडदौडीने चालू होत्या.

नाना—एक संसारिक व्यक्तिमहत्व !

—डॉ. वसन्तराव राजोपाध्ये

गायनाचार्य पं. नारायणराव व्यास यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आज त्यांचा सत्कार होत आहे. प्रख्यात गायक म्हणून त्यानी आपले नांव झळकवले आहेच. एकवेळी व्यासांचा जमाना होता ! व्यासांचे सांगीतिक कार्य लोकांना ठाऊक आहेच पण व्यक्ती म्हणून त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या घनिष्ट सहवासांत राहिलेले त्यांचे शिष्य (व मेहुणे) डॉ. वसंतराव राजोपाध्ये यानी उलगडून दाखवले आहेत.

—संपादक

'संगतीला रहावे आणि पंगतीला जेवावे म्हणजे माणसाची पूर्ण कल्पना येते' अशी म्हण आहे. नाही म्हटले तरी गेली साडेचार तपे मी नारायणराव व्यास यांच्या संगतीत (आणि कित्येक वर्षे पंगतीला) आहे. त्यामुळे प्रथितयश गायक कलाकार आणि त्याचबरोबर संसारी व्यक्ती—नागरिक म्हणून त्यांच्या दुहेरी व्यक्तिमत्वाचा मला जवळून परिचय झाला आहे. त्यांच्या स्वभावाचे विविध कंगोरे पहावयास मिळाले आहेत. गायक—कलावंत म्हणून रसिकांना त्यानी आपल्या गायन शैलीने अकृष्ट करून घेतले. त्याच बरोबर नातेवाईक मित्रमंडळीत आणि परिवारातही त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप पडलेली आहे.

'नाना' झाले

नारायणराव याना कित्येक वर्षे नातेवाईक मित्रमंडळी 'नारायणराव' म्हणूनच संबोधीत असत. त्यांच्या काय आमच्या घरी सुद्धां आम्ही त्याना 'नारायणराव' म्हणत असूं. मुंबईस येईपर्यंत त्याना 'नाना' हे उपनाव मिळाले नव्हते. त्यानी दादरला १९३४ मध्ये 'व्यास भुवन' बांधल्यावर हा योग आला. त्याचे असें झाले. वस्तुशांतीच्या निमित्ताने पुष्कळ नातेवाईक जमले. इतर ही परिचित लोक घरी येऊ लागले. सर्व लोकांनी 'नारायणराव, नारायणराव' हे म्हटलेले मला व सौ. आक्काला खटकूं लागले. आमच्या राजोपाध्ये घरांत मुलाना, दादा, नाना, आण्णा अशी उपनावे आहेत. (इतर घरी पण आहेत.) त्यानुसार आम्ही नारायणराव याना 'नाना' संबोधू लागलो. अशाप्रकारे ते आम्हा कुटुंबियांचे व घरोब्याच्या लोकांचे 'नाना झाले.

कॉलेजियन गवई

तरुणपणी नारायणराव सडसडीत बांध्याचे होते. गौर हंटींग/वर्ण, सरळ नाक, कॉलरचा शर्ट, हंटींग फॅशनचा कोट, हंगेरीअन गोल टोपी, पंपशू अशा वेषांत ते एकाद्या कॉलेजियन प्रमाणे दिसत १९२०—१९२१ च्या सुमारास 'गवई' या व्यक्तीबद्दलच्या कल्पना विकृतच होत्या. आक्काच्या लग्नाच्या वेळी त्यांचे स्थळ कुणी तरी सुचविले. अधुनिक वेषातील नारायणरावाना पहाताच गवई या प्रतिमेला विस्मयाचा धक्का बसला ! आमच्या वडिलाना—बापूरावाना नारायणराव पसंत पडले. मेडीकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दादालाही कॉलेजीयन गवई मेव्हणा म्हणून आवडला. आणि आक्का सौ. लक्ष्मीबाई व्यास झाली.

आत्मविश्वास

आमच्या आजोबानी गवय्यांचे आयुष्य जवळून पाहिलेले असल्याने त्यांच्या 'आमदनीची' त्याना कल्पना होती. त्याना नवीन—अधुनिक गायक वर्गात मोडणाऱ्या नारायणरावांच्या भरपूर मिळकतीची कल्पना नव्हती. आजोबा भोर संस्थानकडे नोकरीत होते. ते म्हणावयाचें नारायणराव, भोरकरांकडे शब्द टाकूं कां ? दरबारांत नोकरी मिळेल, पहा बुवा ! नारायणरावानी सौम्य शब्दात नकार दिला. आपल्या

नव्या स्वतंत्र व्यवसायाची कल्पना आजोबाना दिली तरी जुन्या जमान्यांतील आजोबाना ते पटले नाही. ते काहीसे नाराजच झाले. पण पुढे १९३४ साली दादरला 'व्यास भुवन' बांधले गेले त्यावेळी नात जावयाचे कौतुक करण्यासाठी वास्तुशांतीचेवेळी खूप वय झालेले असूनही मुद्दाम आले. तरुणपणातील अवघ्या ३२ व्या वर्षीच्या नात जावयाचे यश पाहून त्यांच्या डोक्यांत आनंदाश्रु उभे राहिले. आपली आठवण म्हणून त्यानी साताऱ्ची खास सोनचाफ्याची रोपे व्यास भुवनसाठी आणली त्यापैकी आज एक अजून फुलते आहे.

वागण्यात तारतम्य

लग्न झाल्यावर नाना सासुरवाडीला केव्हा केव्हा यावयाचे! त्यावेळी स्नान झाल्यावर 'संध्या' कटाक्षाने करावयाचे. स्नान करून आल्यावर त्यांच्या टांचा गुलाबी गुलाबी दिसावयाच्या. त्याचे आमच्या आईला किती कौतुक! पुढे बिल्डींग झाल्यावर तर या कौतुकाला सीमाच राहिली नाही. व्यास आणि राजोपाध्ये उभयतां घरण्यांत श्रीमंत व्यक्ती म्हणून त्यांचा नाही म्हटले तरी दबदबा निर्माण झाला. तरीही ठिकाण, व्यक्ती पाहून नाना तारतम्याने वागत त्यांचे सर्वांना कौतुक असे.

व्यवस्थितपणा

नानांना कपड्याचा शौक आहे. ते वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळे कपडे परिधान करतील. पण वापरून झाल्यावर नीट घड्या घालून व्यवस्थित कपाटांत ठेवतील. उनी कपड्यात डांबराच्या गोळ्या घालून ठेवतील. आपल्या वस्तू जेथल्या तेथे ठेविल्या गेल्याच पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असतो. प्रसंगवशात् त्यांची एकादी वस्तू कुणी वापरण्यास नेली तर ती घरी येऊन योग्यजागी पडेपर्यंत त्याना चैन पडणार नाही. दाढी केल्यावर ब्लेड नीट पुसून ठेवतीलच पण ती गंजू नये म्हणून कडाना व्हॅसलीन किंवा तेलाचा बारीकसा हात लावतील!

हिशोबीवृत्ति

नाना फार हिशोबी आहेत. वावगा खर्च त्याना खपत नाही. बाजारांत गेल्यावर चार ठिकाणी जिन्नस म्हणा भाजी म्हणा पाहिल्या शिवाय, दराची चौकशी केल्या शिवाय खरेदी करणार नाहीत. शक्यतो वाजवी कमी किमतीत माल खरेदी करतील. त्यांत फसणार नाहीत. १९३१-३३ च्या सुमारास कित्येकदा सहा आण्यांत सेंट्रल स्टेशनवरून सरदारगृहांत ते, आम्ही आलो आहोत. एवढेच काय क्रॉफर्ड मार्केट मधून त्यावेळी महाग मिळणारा कॅरम बोर्डही स्वस्तात मिळविला. या बाबतीत ते भाग्यवान आहेत.

त्यांच्या हिशोबीपणाची आणखी दोन उदाहरणे देण्याचा मोह मला आवरत नाही. बाहेर गावी जाताना ट्रंकबेडींग खाली उतरवूनच मग ते टॅक्सी बोलावतील. तुम्ही आम्ही टॅक्सी आल्यावर मग सामान खोली बाहेर काढू! मीटर वाढतेच आहे, होय ना?

दोघेजण हॉटेलमध्ये चहा घेण्यास गेलो तर "ट्रे" मागवतील पण त्याबरोबर एक सुटा कप! ट्रेमध्ये आडीच कप चहा असतो. तो दोघाना खूप पुरतो. ट्रेचे सौख्य. व दोघांचा स्वस्तात चहा. काय?

खवैया गवैया

नाना चवीने जेवणारे आहेत. ते स्वतः चांगला सैपाक करतातच. पण चांगल्या सैपाकाला "दाद" देतात. मला व इतर शिष्यांना त्यानी सैपाक करावयास शिकविला आहे. मागे केव्हा तरी चांगल्या चाखलेल्या जेवणाची त्यांची आठवण ताजी असते. दिव्यास सासुरवाडीस खाल्लेली वांग्याची भाजी, मद्रासला जाताना आईने डब्यात भरून दिलेली चाकवताची भाजी, किंवा बडोद्याला जलशाला जाताना सौ. आक्काने दिलेली फ्लॉवरची भाजी व लसणाची चटणी यांच्या चवदारपणाचे वर्णन इतके दिवस झाले तरी रंगून रंगून सांगतात! नानाना सायीचे दही फार प्रिय आहे. कांद्याची भजीही तशीच त्याना फार आवडतात. कांद्यांची भजी खाऊन त्यांचा आवाज कधीच बिघडलेला नाही.

गोष्टी वेल्हाळ नाना


गोष्टी वेल्हाळ पणा हा नानांचा प्रमुख विशेष आहे. ते कुठेही गेले तरी लोकाना गप्पा गोष्टीत रंगवतील. बोलण्याचे सर्व काम तेच करतील! त्यांत त्यांचे बालपण, संगीत शिक्षण,

लक्ष्मीनारायणांची जुगलबंदी

(राजोपाध्ये–व्यास)



संसारसारंगीच्या ताती आणि तराफा
अशा मस्त जुळल्या !



स्वरसुखी व्यास-कुल :– श्री. नाना, सौ. आक्का असे लक्ष्मीनारायण, चिरंजीव अतुल (विद्याधर),
सूनबाई सौ. विनीता, चि. अमोल व आलोक

दौरे, प्रवास आणि इतर सटर फटर गोष्टी असतील. त्यांच्या बोलण्यांत तेच ते विषय वारंवार येतील ! नाना पत्ते उत्तम खेळतात. एकेकाळी ब्रिजमध्ये ते पारंगत होते. दादाच्या लग्नात तर 'नलोज' मधील त्यांचे प्राविण्य पाहून लग्नात जमलेले नोकरदार पाहुणे चकीत झाले होते !

नाना नकला चांगल्या करतात. गं. भा. बाईची नक्कल आम्हाला हसवून सोडी. वझे बुवांच्या आवाजांत "हुबेहुब डायबीटीस आहे" म्हणून दाखवतील. 'कोट टोपी बूट नेक् टाय" हे वाक्य टाळ्याच्या टकरात विलक्षण वेगाने (द्रुत लयीत) त्यांच्याकडून ऐकण्यासारखे आहे. नाना स्वतःला तोशीश लावून घेणारी व्यक्ती नाही. त्याचप्रमाणे कुठंही आपली गैरसोय करून घेणारे नाहीत. नातेवाईक-मित्राकडे गेले तरी आपल्यास हव्या त्या सोयी निःसंकोचपणे करवून घेतील. नाना नियमित रहातात. त्याना व्यसन असे कांडही नाही. जेवण झाल्यावर बदाम घातलेला विडा मात्र हवा ! चहा सुद्धा सकाळी आणि सायंकाळीच. रात्री निजताना दूध हवे ! यामुळे त्यांची प्रकृती ठणठणीत राहिली आहे.

भाग्यवान नाना

नानाना कीर्ती आणि लक्ष्मीचे वरदान लाभले आहे. त्यामुळे त्यांना संसारात कधी कुठला प्रॉब्लेम आला नाही. सर्व आयुष्य सुरळीतपणे गेल्याने त्याना कुणाचा सल्ला घेण्याची कधी जरुरच पडली नाही. ते नेहमी Aloof च असतात. गप्पा टप्पा करण्यासाठी घरी कधीच वर्दळ नसते ! मनासारख्या सर्व गोष्टी घडत गेल्याने त्याना कुणाकडे काही मागावे लागले नाही. ते आत्मसंतुष्ट आहेत.

मी–शिष्य

नानाकडे मी १९३१ साली शिकावयास आलो. नात्याने मेहुणा असून ही त्यानी मला विद्यार्थी या नात्यानेच वागवले, गुरुगृही विद्यासंपादण्यासाठी मी सर्व कामे आनंदाने केली. भरलेल्या घरांत पुरुषानी–मुलानी काही कामें करावयाची नाहीत अशा घरातून वाढलेल्या मला ही कामे करण्यास संकोच वाटला नाही. मी जी सेवा केली त्याचे फळ मला मिळाले आहे. व्यास विद्यालय त्यांनी माझ्या विश्वासावर सुरु केले. त्यांनी नातेवाईक म्हणून मला वागवले असते तर मला कष्टाने विद्या घेणे काय असते हें समजले नसते आणि कदाचित् मला विद्या आलीही नसती.

सर्वांची एकच इच्छा !

वयोमानाने नाना थकत चालले आहेत. पण अद्याप त्यांचा आवाज तरुण आहे. तो तसाच शेवटपर्यंत कायम रहावा व त्यांचे मधुर गायन ऐकावयास मिळावे अशी माझ्याबरोबर सर्व रसिकांची इच्छा असणार, होय ना ?

अमृत महोत्सव प्रसंगी ती. नानांच्या चरणी नम्र अभिवादन.

....
....

GAYANACHARYA

PT. NARAYANRAO VYAS

Pt. Narayanrao Vyas needs no introduction to a person who may have even a slight interest in classical music. His sweet and chaste music, torrential Tanas, crystle clear Boltanas and melodious touching Bhajan's have been captivating and entertaining the music loving audience at home and abroad through countless concerts all over the country, gramophone records, radio programmes and all other mass media for no less than last fifty five years; thus serving and contributing to the music and culture of India in a real great way.

Pt. Narayanrao Vyas was born in April, 1902, at Kolhapur in South Maharashtra in the family of well learned and highly respected Sanskrit Pandit Shri Ganeshpant Vyas, who besides being Sanskrit Pandit and an honoured "Puranik" in the famous temple of Goddess Shree Ambabai, was a keen lover of music. Though, he could not learn music systematically like the Sanskrit, he used to play Sitar and sing Bhajan in a very melodious voice. His keen interest and love for music if not Sanskrit, thus. was inherited by his three sons Ramchandra, Shankar and Narayan. Yougest among two sisters and three brothers, Narayan lost his father at his early age of 2 years, and mother at the age of 8. Eldest brother Ramchandra Vyas began looking after the family and family property at and near Kolhapur.

Death of Shri Ganeshpant Vyas hit a blow to the family and the school-going brothers had to suspend their schooling, which has not progressed beyond 4th and 5th standards. In school, the brothers Shankar and Narayan were not only among the top ranking students, but they were more known for their music talent and sweet voice. Fortunately during this time, the great saint musician Pt. Vishnu Digambar Paluskar was touring Kolhapur alongwith the students of his school 'Gandharva Mahavidyalaya'. Pt. Paluskar, in his mission of bringing-up music to the high social status, used to appeal during his concerts to the parents of music loving children that they should encourage the love of this children towards music and that if, they wished, they may send their children to 'Gandharva Mahavidyalaya', a 'Gurukul' institute and the classical music training would be given to them without any fees. The appeal, the cerene atmosphere of Gandharva Mahavidyalaya, the strict discipline and commendable performances of the students had a tremendous impact on Vyas family and relatives. Shankar was so overwhelmed that he snatched the earliest opportunity to join the students of Gandharva Mahavidyalaya and Narayan was disappointed because he was a bit too young to be admitted there alongwith his elder brother. Somehow Narayan impatiently waited for three years and then on getting permission from eldest brother and close relatives, he straightway headed for the Gandharva Mahavidyalaya in Bombay.

From 1912 to 1922, the ten years of rigorous training in Gandharva Mahavidyalaya brought about a complete transformation of the personality of Narayan. Pt. Vishnu Digambarji was very strict and disciplined master and expected the similar sincerity and disciplined devotion of his students to the study of music. Pt. Paluskar taught his student not only music, but he expected his students to stand all the tests of a good citizen. He taught them good manners, etiquettes and art to live in Society as a respectable citizen. He had realized and struggled all his life to give respectability to music and musician in the society and so he used to say, 'my student should first be a good and respectable citizen and next a good musician'. This all-round training, music and social, transformed Narayan into Pt. Narayanrao. He was among the most favourite disciples of his guru and had rare previledge of accompanying his Guru during the many concert tours of various places in India. He not only toured practically whole of India several times, but gained valuable concert experience most indispensable for a performing art like music. In 1922, Narayanrao obtained the highest degree of the Gandharva Mahavidyalaya, 'Sangeet Praveen' with the honour of Gold Medal conferred on him by the Governor of Bombay.

After passing out with honours as classical vocalist from Gandharva Mahavidyalaya, Narayanrao chose to settle down in Ahmedabad as per the wish of his esteemed Guru. It was policy of orsight of Pt. Paluskar to send his trained students to cities in different parts of the country so that his mission is carried by these students extensively in the country and in society. Narayanrao started his 'practice' (teaching and poplarizing classical music through concert performances) in Ahmedabad alongwith his brother Shankarrao who too had passed-out with honours. On the footsteps of Guru Pt. Paluskar, the 'practice' of Narayanrao began flourishing and soon he was well-known as very good teacher and artist in and around Ahmedabad. Success and popularity as teacher-cum-Artist was coming his way, but Narayanrao was restless and unsatisfied. As an artiste, he had seen and experienced the spell of his sweet, melodious voice and of his music on audiences with all the concert experience and judgements of success at his command, Narayanrao aspired for his rightful place among the top performing artistes on all-Indai level. He thought and dreamt of nothing, but cencerts and successful concerts and thus driven by the strong force of aspiration and ambition, he decided to leave Ahmedabad and come to Bombay to try his luck as performing artiste.

It must have been a God-blessed moment in 1927, when Pt. Narayanrao arrived in Bombay. The music world of Bombay was as if waiting for Pt. Narayanrao. The beginning was made by those audience packed Ganeshotsav concerts and very soon Narayanrao was invited by the Gramophone Company to perform on the 'His Masters' Voice' Gramophone records. The release of his first records was a real break through for him and for the classical music system on gramophone disc. His rendering of 'Yeri Mohe Ja' (Adana) 'Radhe Krishna Bol' (Bhajan) Ragas 'Malkauns' 'Goud Malhar' and other compositions over the gramophone discs broke all previous records of popularity and the Gramophone

Company presented him a gold medal in token of its gratitude. The broadcasting had then recently started and Pt. Narayanrao was previledged to get contract among the first engagements over the Bombay Radio Station. These two media helped tremendously in popularizing music of Pt. Narayanrao. Subsequently he began getting engagements for classical vocal concerts from all parts of the country. With the year 1930, started a new era of Music Conferences and Pt. Narayanrao started getting invitations from each of the conferences held in different parts of the country. He travelled most extensively all over the country and this provided him rich experience of concert performances and also he could listen to the music of many contemporary musicians and could decorate his own style and performances with the good and exemplary virtues of others which has adopted and moulded in his music. With these developments with time, the popularity of Pt. Narayanrao and his music was ever rising.

The awards, honours and appreciations came their naturally way to Pt. Narayanraoji.

The Harivallabh Mela at Jullundur honoured him with their coveted title, 'The Best Musician in the Handa'. The titles 'Gayanacharya', 'Tan-ke-Kaptan', 'Sangeet Maha Pandit', 'Sangeet Mahamahopadhyaya', 'Sangeet Ratna' were conferred on him in various music conferences. The honours included such ones as the 'India's First Prize Winning Singer for the year 1948' from India Film Jornalists Association, Mysore City and the latest 'Swara Vilas' from the Sangeet Peeth of the Sur Singar Samsad, Bombay in 1975. The Kendriya Sanyeet Natak Akadami, New Delhi, has recently presented to him, as a token of appreciation of his meritorious service to music, the year 1976 Award of the Best Hindustani Classical Vocalist'. Be-sides there are hundreds of 'Manpatras' presented to him on several occasions of music concerts. The gramophone records of Pt. Narayanraoji have been preserved in the American National Library since 1930 as the representative of Indian Classical Music.

The teacher-profile of Pt. Narayanraoji was also attracting many music lovers and students alongwith his artistey and in fact, his music concerts inspired many students to come to him for guidance in classical music. To cater to the public demand for standard instructions in classical music, Pt. Narayanrao alongwith the elder brother Pt. Shankarrao and disciple Prof. Vasantrao Rajopadhye founded a music academy 'Vyas Sangeet Vidyalaya' in 1937 at Dadar, Bombay. The institution is a Public Trust and over about 200 students on an average are benefitting from this Vidyalaya every year. The students of Pt. Narayanraoji are spread all over the country and these students are very well placed in the music field, thus carrying and spreading the message and inspiration of Saint Musician Pt. Vishnu Digambarji brought to them by the able teaching of Pt. Narayanraoji. Pt. Narayanraoji teaches generously and has given his legacy and art to his son Shri Vidyadhar alias Atul who with his merit and teaching from father has begun making a name in the field of music and performance.

Pt. Narayanraoji is still singing - at the age of 75 - and with the same sweetness of voice and vigour and virility of presentation. His music still 'not only pleases you one and all intensely, but elevates your soul from this world to the sphere of Divinity".

★

आमचे नाना–एक आगळे व्यक्तिमत्व

सौ. विमल कुळकर्णी

पण्डित नारायणराव व्यास हे "नाना" या नावाने त्यांच्या विद्यार्थीवर्गात व नातलगात परिचित आहेत. माझे बालपण पुण्यात गेले. माझ्या अगदी लहानपणी मी नानांच्या रेकॉर्डस ऐकल्या. वास्तविक त्यावेळी मला संगीताची जरा सुद्धा माहिती नव्हती. परंतु नानांच्या रेकॉर्डस मला फार आवडत असत आणि एवढ्या लहान वयात आम्ही तासनतास ग्रामोफोनजवळ बसून त्यांची गाणी ऐकत असू कारण त्यात एकप्रकारचा आनंद देणारा गोडवा व आकर्षण होते.

अशा ह्या थोर व्यक्तीजवळ गायन शिकण्याचा अलभ्य लाभ कधी काळी, आपल्याला घडेल असे माझ्या ध्यानी मनी नव्हते. परंतु तीस पसतीस वर्षापूर्वी आम्ही पुणे सोडून कायमचे मुंबईत आलो. गुरुवर्य घाग यांच्याजवळ माझे थोडेफार गायनाचे शिक्षण झाले असल्यामुळें पंडित नारायणरावांनी मला गायन शिकविण्याचे कबूल केले व त्यामुळे नानांकडे शिकण्याचा एक सुंदर योग माझ्या आयुष्यात घडून आला. आणि आज तीस पसतीस वर्षे मी नानांचे व्यक्तिमत्व जवळून अवलोकन करीत आहे.

या वयातही गाता गळा

चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी "राधेकृष्ण बोल, घगरी मोरी भरन नही देत, बालम मोरा सुनियो, श्याम सुंदर मदन मोहन, फुलवाले कंत" वगैरे अनेक रागदारी चिजांनी व भजनांनी महाराष्ट्रच नव्हे तर अखिल हिंदुस्थान दुमदुमून टाकणारे आमचे नाना आज पंच्याहत्तराव्या वर्षी सुद्धा तितक्याच दमदारपणाने गोडगळ्याने गाताना ऐकले की आश्चर्य वाटते.

नाना मात्र या गोष्टीचे सगळे श्रेय गुरुकृपा, गुरुने त्यांच्या अंगी बाणवलेली कडक शिस्त, निर्व्यसनी जीवन, जबरदस्त मेहनत याला देतात. नानांनी हजारो मैफली गाजवल्या, अनेक संगीत परिषदांतून आपल्या चटकदार गोड गायनाने लोकांची मने जिंकली. नाना आपली कला श्रोतृवृंद पाहून मांडतात त्यामुळे त्यांची मैफल नेहमीच यशस्वी होते. आणि याच कारणास्तव त्यांचे गायन सर्व स्तरांच्या लोकांप्रत पोहोचलेले आहे. उत्तर हिंदुस्थानी लोक नानांना फारच मानतात. आणि याचा अनुभव मी त्यांच्याबरोबर काहीं संगीत परिषदांना गेले असता मला प्रत्यक्षच पहावयास मिळाला. टाळ्यांच्या कडकडाटात नानांचे गाणे संपले की अनेक श्रोते त्यांच्याजवळ येऊन "वा पण्डितजी, आपने तो आज खूब कमाल की" असे जेव्हा सांगत त्यावेळेला एवढी मोठी कलासंपन्न व्यक्ति आपल्याला गुरु म्हणून लाभल्याबद्दल माझा अभिमान द्विगुणित होत असे. दक्षिण हिंदुस्थानी लोक सुद्धा त्यांच्या गायनाला खूप दाद देत असत "नींदु चरणमुले" हे त्यांचें कानडी भजन त्यावेळी दक्षिण हिंदुस्थानांत प्रसिद्ध होते.

अशी स्वयंशिस्त

संगीत परिषदेच्या निमित्ताने जातांना तऱ्हेतऱ्हेच्या लोकांच्या सहवासात रहावे लागत असे. त्यांच्याबरोबर प्रवास करावा लागत असे. परंतु त्यांनी आपली शिस्त कधी सोडली नाही. मनाचा तोल कधी जाऊ दिला नाही आणि याच कारणास्तव आज मुंबई सारख्या ठिकाणी त्यांच्या स्वतःच्या मालकीची सुंदर वास्तु असून ते मोठ्या मानाने जीवन कंठीत आहेत.

नानांचा जलसा ऐकण्याचा पहिला योग आला तो पुण्याच्या रास्तापेठ गणपतीसमोर. त्यावेळी मी अगदीच लहान असेन परंतु त्यांनी त्यावेळी गायलेल्या गौडमल्हार रागातील "काहे हो हमे" या ख्यालाचे व "बल्मा बहार आयी" या चिजेचे स्वर अजूनही माझ्या कानात रेंगाळत

आहेत. जलसा पहाटे तीन वाजेपर्यंत झाला परंतु एकही व्यक्ती जागेवरून उठली नाही. सर्व मंडप व आजूबाजूच्या घरावरचे पत्रे माणसांनी नुसते फुलून गेले होते.

तुमहो विद्यादाता

नानांनी मोठा शिष्यवर्ग तयार केलेला आहे. परंतु विद्यादान करताना त्यांनी विद्यार्थ्यांकडून फीची अपेक्षा कधीच केली नाही. चांगला आवाज, रियाज करण्याची इच्छा एवढी सामुग्री विद्यार्थ्यांजवळ असली की बस मग नाना त्या विद्यार्थ्याला अगदी मनापासून शिकवतात. येवढेच नव्हे तर स्वतःच्या घरी ठेवून घेऊन त्यांच्या रहाण्या जेवण्याची सोय करून सुद्धा काही विद्यार्थ्यांना त्यांनी संगीताचे धडे दिले आहेत. अमुक एक चीज ठेवणीतील आहे ती कोणाला शिकवावयाची नाही अशा गोष्टी नानांच्या दिलदार स्वभावाला कधीच पटल्या नाहीत. त्यांनी ओंजळी भरभरून संगीताचे ज्ञान शिष्यांच्या पदरात टाकलेले आहे. शिष्य जे काही शिकण्याची इच्छा प्रदर्शित करील (मग तो राग असो, ठुमरी, होरी, भजन, तराणा किंवा टप्पा काही असो) ते त्याला अगदी खुल्या दिलाने शिकवतात अमुक एक राग शिकवता का ? म्हणून विचारल्यावर, तुला तो एवढ्यात येणार नाही वगैरे कोणतीच सबब त्यांनी सांगितलेली निदान माझ्या तरी आठवणीत नाही. नानांचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते स्वतः तबला वाजवून शिकवतात. त्यामुळे शिकवताना तबलजी नसल्यास त्यांचे काम अडत नाही. नानांच्या शिष्यांपैकी अनेक शिष्य आज संगीताच्या निरनिराळ्या क्षेत्रात अग्रगण्य राहून त्यांनी दिलेले ज्ञान कारणी लावत आहेत.

स्त्रिया आणि संगीत

स्त्रियांनी संसार सांभाळून संगीताची जेवढी सेवा करता येईल तेवढी जरूर करावी असे त्यांचे मत. आपल्या विद्यार्थीनीला संगीतात प्रोत्साहन देणारे सासर मिळाले तर नानांना खूप आनंद होतो पण याच्या विरुद्ध परिस्थिती असल्यास तितकेच वाईट वाटते. या गोष्टीला बरीच वर्षे झाली. एकदा एक विद्यार्थीनी लग्न झाल्यानंतर पतिराजांना घेऊन तंबोरा विकण्यासाठी विद्यालयांत आली. कारण काय सासरच्या मंडळीना गायनाची आवड नाही. नानांना खूप वाईट वाटले. नाना तिच्या यजमानांना म्हणाले " तुम्हाला या तंबोऱ्याची किती किंमत हवी ? ती मी देतो. पण हा तंबोरा तुमच्याच घरी राहू दे. मुलीचा आवाज छान आहे. पुढे मागे तिला गायन शिकण्याची संधी मिळाली तर याचा उपयोग होईल."

माणसाने स्वावलंबी असावे. वेळ पडल्यास कोणतीही गोष्ट करता आली पाहिजे असे त्यांचे मत. ते सुधारक मताचे आहेत. सर्वांचे गाणे ऐकावे व निवडक तेवढेच वेचून घ्यावे. गायन कला ही ऐकून ऐकून खूप वाढवता येते. शिक्षण चार आणे तर श्रवण बारा आणे असे ते म्हणतात.

नानांना आपल्या शिष्यांची कीर्ती ऐकून खूप आनंद होतो व ते आपला आनंद शिष्यासमोर व्यक्त करून त्याला प्रोत्साहन देतात. नानांची शिस्त जरी कडक असली तरी ते प्रेमळ आहेत. ते एकदम कोणावर चिडणार, रागावणार नाहीत. कोणतीही गोष्ट पूर्ण विचार केल्याशिवाय करणार नाहीत. अशा ह्या मन मिळाऊ दिलदार, आपल्या शिष्यांवर अपत्याप्रमाणे माया करणाऱ्या अष्टपैलू स्वभावाच्या नानांच्या चरणी वंदन करून त्यांना, सौ. आक्कांना व त्यांच्या सर्व कुटुंबियांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी मी त्यांच्या अमृत-महोत्सवी वर्षपूर्तीच्या दिवशी परमेश्वराकडे प्रार्थना करते.

★